## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## नाशिक विभागीय मंडळ, नाशिक — ४२२००३

---

**महत्वाचे**

क्र.नाविमं/उमा/अ—१/ ९६६५
नाशिक — ४२२ ००३
दिनांक २९/१०/२०२०

प्रति,
प्राचार्य/मुख्याध्यापक,
सर्व मंडळ मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविदयालये,
नाशिक/धुळे/जळगांव व नंदूरबार जिल्हे

**विषय :— उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) फेब्रुवारी—मार्च २०२१ च्या परीक्षेनंतर जुन्या अभ्यासक्रमाच्या विषयामध्ये सूट न मिळालेल्या/उत्तीर्ण न झालेल्या विदयार्थ्यांबाबत...**

संदर्भ :—क्र.रा.मं./पापुई/जु.अ.—२०२१/४३८१/दि.१५ ऑक्टोंबर, २०२० चे पत्र.

उपरोक्त संदर्भिय पत्रास अनुसरून कळविण्यात येते की, पुनर्रचित अभ्यासक्रमाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०१९—२० इ. ११ वी साठी व शैक्षणिक वर्ष २०२०—२१ पासून इ. १२ वी साठी राज्य शैक्षणिक आणि प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र (विदया प्राधिकरण), पुणे व महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती), पुणे यांच्याकडून करण्यात आलेली आहे.

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) फेब्रुवारी—मार्च २०२० च्या परीक्षेत अथवा त्यापूर्वी ज्या विद्यार्थ्यांना जुन्या अभ्यासक्रमामध्ये काही विषयामध्ये सूट मिळालेली नसेल अशा विद्यार्थ्यांना पुरवणी परीक्षा **सन २०२०—२१ मध्ये पहिली व फेब्रुवारी—मार्च २०२१ मध्ये दुसरी अशा दोन संधी राहतील.**

सदर दोन संधीनंतरही विद्यार्थ्यास काही विषयामध्ये सूट न मिळाल्यास अथवा तो उत्तीर्ण न झाल्यास इ. १२ वी च्या पुनर्रचित अभ्यासक्रमाच्या शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१९/प्र.क्र.(२४३/१९)/एसडी—४, दि.०८/०८/२०२० मधील इ. ११ वी व इ. १२ वी विषय योजनेतील योग्य विषयाची निवड करून विद्यार्थ्यास विषयामध्ये उत्तीर्ण व्हावे लागेल. तथापि, प्रात्यक्षिक परीक्षा नसलेला विषय घेवून विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ झालेला असेल व त्या विषयामध्ये त्याला सूट मिळाली नसेल, अशा विद्यार्थ्यास विषय योजनेतील प्रात्यक्षिक असलेल्या विषयाची निवड करता येणार नाही, याची नोंद घेण्यात यावी.

**(नितीन उपासनी)**
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, नाशिक विभागीय मंडळ,
नाशिक — ४२२ ००१